ग्रंथ पुरस्कार । अपारंपरिक

## मनोगत

लक्ष्मीनारायण बोल्ली

# तेलुगुच्या वेली मराठी फुलली




**तेलुगु मंडळींच्याच घरात राबत असल्याने आणि आजूबाजूला तेलुगु साळी वाडेच व्यापलेले असल्याने मराठीत बोलण्याचा सरावच नाही. सारं काही तेलुगुतच भागायचं; पण काही पिढ्यांनंतर मात्र आम्ही वेडेवाकुडे का होईना, तेलुगुबरोबर मराठीही बोलू लागलो. या मराठी मातीशी एकरूप होता होता, आपली तेलुगु संस्कृतीही जपू लागलो. पूर्वी रामय्या, नरसय्या अशी असलेली आमची नावं, आता नामदेव, तुकाराम, विठोबा अशी होऊ लागली. पंढरीच्या वाटेवर वारकरी होऊन आमची मंडळी चालू लागली.**

मी एक तेलुगु माणूस. माझी मातृभाषा तेलुगु, तर गात्रभाषा मराठी. गळा तेलुगुचा, लळा मराठीचा. 'बहुत सुकृताची जोडी। म्हणोनि मराठीची आवडी' असं आगळं वेगळं भाग्य मला लाभलं. आम्ही मूळचे आंध्र प्रांतातल्या तेलंगणातले. सुमारे शे-सव्वाशे वर्षांपूर्वी माझे आजोबा, आजी उदरनिर्वाहासाठी, पायी चालत या सोलापुरी आले.

सोलापूर हे महाराष्ट्राच्या सीमेवरचं गाव. सोलापूरच्या अल्याड आंध्र तर पल्याड कर्नाटक. त्यामुळे येथे विविध भाषकांचं स्नेहशील संमेलन. विविध संस्कृती हातांत हात घालून बहिणीगत नांदत असलेल्या. सोलापूर नगरी ही श्री सिद्धरामेश्वर या सत्पुरुषाच्या पावन स्पर्शाने पुनीत, तर त्यांच्या मधुरतम कन्नड वचनांनी भारावलेली. या नगरीला कविराय रामजोशींच्या काव्याचा वारसा, तर देशासाठी एकाच दिवशी प्राणांची कुरवंडी करणाऱ्या हुतात्म्यांचं धगधगते शौर्य, या बाबी मागच्या पिढीनं, पुढच्या पिढीसाठी दिलेला रत्नजडित खजिना. अशा मराठी मातीत दिनांक १५ एप्रिल १९४४ रोजी माझा जन्म झाला.

आमचं विणकर... साळी कुटुंब. घरात आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण. हातमागावर कापड विणणाऱ्या, आसामी मंडळींकडे आजोबा आणि आजीने सदैव कामाला जुपून घेतलेलं. पहाटे पाच वाजल्यापासून आजोबा आपल्या खड्डामागाच्या आकड्याला ढणढणत्या चिमणीचा दिवा लटकावून, धोटा फेकत कापड विणणारे कामगार, तर आजी सूं-सूं करीत फिरणाऱ्या चरख्यावर कांड्या भरणारी कारभारीण. दोघेही ठार अशिक्षित. तेलुगु मंडळींच्याच घरात राबत असल्याने आणि आजूबाजूला तेलुगु साळी वाडेच व्यापलेले असल्याने मराठीत बोलण्याचा सरावच नाही. सारं काही तेलुगुतच भागायचं; पण काही पिढ्यांनंतर मात्र आम्ही वेडेवाकुडे का होईना,

## लक्ष्मीनारायण बोल्ली

स्वत:ला 'आंतरभारती'चा उपासक मानणाऱ्या लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी 'तेलुगु' भाषेतील उत्तमोत्तम साहित्य मराठीत आणले असून; तेलुगु-मराठीचा तौलनिक अभ्यास करताना लिपी, भाषा, साहित्य, संस्कृती, खेळ, नाट्य, शिल्प, अलंकार, व्रतवैकल्ये, लोकगीते, लोककथा आणि संतसाहित्य यांचा सुमारे एक हजार वर्षांचा धांडोळा घेतला आहे. त्यांनी स्वतंत्र कविता व ललित लेखन केले असून तेलुगुतील कविता, कथा, कादंबरी व नाटक या चारही प्रकारचे सर्जनशील लेखन मराठीत आणले आहे.

'एका साळियाने' हे तेलुगु भाषिक व्यक्तीचे मराठीतील पहिलेच आत्मकथन असून, त्यात दोन भाषांचे, भाषिकांचे व संस्कृतींचे दर्शन घडते.



तेलुगुबरोबर मराठीही बोलू लागलो. या मराठी मातीशी एकरूप होता होता, आपली तेलुगु संस्कृतीही जपू लागलो. पूर्वी रामय्या, नरसय्या अशी असलेली आमची नावं, आता नामदेव, तुकाराम, विठोबा अशी होऊ लागली. पंढरीच्या वाटेवर वारकरी होऊन आमची मंडळी चालू लागली.

आता माझ्या बालपणीची गोष्ट सांगायची झाल्यास, निदान एकदोन बुकाचं शिक्षण व्हावं, या माफक हेतूनं, मला शाळेत घातलं गेलं. शिक्षणाचा हेतू, आधीच ठरल्याकारणानं मी वर्गात अगदी कायम शेवटच्या बाकावरचा. पाठ्यपुस्तकं विकत घेण्याची ऐपत नसल्यानं, पुस्तक आणि मस्तक यांचं नातं जुळलं गेलं नाही. कशाबशा दोन इयत्ता पार केल्या गेल्या.

बालवयातच नोकरीला लावण्याच्या निमित्तानं, एक-दोनदा शाळेतून नाव काढलं गेलं; पण हाडकुळ्या शरीर प्रकृतीमुळं नोकरीतही निभाव लागला नाही. हे कळल्यानं पुनश्च शाळेत दाखल झालो. वर्गातून असा आत-बाहेर होत, माझी शिक्षणाची गाडी एस.एस.सी.च्या स्टेशनावर धडकली ती कायमचीच. शिक्षण नावाची गोष्ट माझ्यापुरती इथंच संपुष्टात आली. पण या शालेय जीवनात, अद्‌भुत म्हणावी, अशी घटना घडली. या घटनेने माझ्यावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत.

मी यावेळी फार तर सोळा वर्षांचा होतो, इयत्ता दहावीत शिकत होतो. एके दिवशी माझे आजोबा म्हणजे आईचे वडील अकस्मात वारले. त्यांच्या अंत्यविधीसाठी, सगळ्यांच्याबरोबर मी पद्मशाली स्मशानभूमीत गेलो. एवढ्यात पावसाची सर आली. तिरडी खाली ठेवून, सारी मंडळी पटापट निवाऱ्यासाठी आसपासच्या झाडाखाली धावली. मीही एका झाडाखाली थांबलो. माझी नजर, सहज समोरच्या समाधीवर गेली. त्या समाधीवर कवितेची काही अक्षरे कोरलेली होती.

'परी जयांच्या दहनभूमीवर
नाहि चिरा, नाही पणती
तेथे कर माझे जुळती'

या ओळी वाचून मी स्तंभित झालो. या ओळी आपण कुठंतरी वाचलेल्या आहेत, याची जाणीव झाली. पण कुठं? हे काही माझ्या मनाला नीट आकळेना. मी काहीसा सैरभैर झालो. मी तेथून सरळ घराकडे धूम ठोकली. घरात खुंटीला अडकवलेलं माझं दप्तर खाली उतरवलं, त्यातून मराठीचं पुस्तक बाहेर काढलं, त्या पुस्तकात 'ती' कविता सापडली-

'तेथे कर माझे जुळती' - कवी बा.भ.बोरकर.

अशा समाधीवरील अक्षरानं, मराठीतील पहिली कविता जी मनावर ठसली ती कायमचीच. माझ्या मनावर 'बोरकर' हे नाव घट्ट मुद्रांकित झालं.

एस.एस.सी. झाल्यानंतर मी एका सहकारी बँकेत नोकरीला लागलो. समवयस्क मित्रांचा उत्साही गोतावळा मला लाभला. बँकेचा सारा व्यवहार मराठीत होत असल्यानं, मराठी किमानपक्षी नीट बोलता यावी, या उद्देशाने मी बुद्धयाच प्रयत्नशील झालो. बँकेत एक छोटंसं वाचनालय खोललं. बँकेच्या मधल्या सुट्टीत पुस्तकांच्या प्रदेशातून भटकंती करू लागलो. ओठावर मराठी रूळावी म्हणून बँकेच्या स्नेहसंमेलनात मराठी नाटके बसवू लागलो. भूमिका वठवू लागलो. हळूहळू माझ्या तेलुगु मनावर मराठीचा मोहक रंग चढू लागला. मराठी वाचता वाचता मी अधूनमधून कथा, कविता लिहू लागलो. हे लेखन पुण्याच्या सकाळ, स्वराज्यातून छापून येऊ लागलं; मन उल्हसित झालं.

जसजशी प्रकाशित कवितांची संख्या वाढू लागली, तसतसा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मोह वाढू लागला. एके दिवशी प्रकाशित चाळीस-पन्नास कवितांचा गुच्छ तयार केला, आता या नियोजित पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहाला कुणा मान्यवर कवीची प्रस्तावना घ्यावी, पण कुणाची, हा प्रश्न पडला. तो चुटकीसरशी सुटलाही. फार पूर्वी शालेय वयात माझ्या मनावर ठसलेले कवी बा.भ.बोरकर आठवले. त्यांच्याशी पत्रव्यवहार केला. या महाकवीने या तेलुगु माणसाच्या मराठी काव्यसंग्रहाला, एक छोटेखानी, प्रासादिक प्रस्तावना लिहिली. एवढंच नव्हे, तर दिनांक १७ सप्टेंबर १९७८ रोजी सोलापूर मुक्कामी येऊन, तो प्रकाशितही केला. पुढे १९८२ साली माझ्या दुसऱ्या काव्यसंग्रहाला 'कवी कुसुमाग्रज' यांनी प्रस्तावना लिहिली. या संग्रहाच्या प्रकाशनाच्या वेळी सरस्वतीपुत्र पु.ल.देशपांडे हजर राहिले. येणेप्रमाणे मी माझ्या लेखनाची वाट चोखाळू लागलो. आजमितीस मी लिहिलेली स्वतंत्र पुस्तकं अशी- १. मैफल- काव्यसंग्रह, २. झुंबर- काव्यसंग्रह, ३. सावली- काव्यसंग्रह, ४. लक्ष्मीनारायण बोल्लींच्या कविता- संपादित काव्यसंग्रह, ५. विरहिणी वासवदत्ता- काव्यनाट्य, ६. गवाक्ष- ललित लेखसंग्रह, ७. तेलुगु फुलांचा मराठी सुगंध- तौलनिक अभ्यास, ८. गीत मार्कंडेय, ९. एका साळियाने- आत्मचरित्र, (महाराष्ट्र राज्याचा न.चिं.केळकर पुरस्कार.)

**अनुवादित पुस्तके –**

१. अभंग कलश – तेलुगु संत वेमनाचा वचनानुवाद, २. एका पंडिताचे मृत्युपत्र – अनुवादित कादंबरी (साहित्य अकादमी प्रकाशन) ३. पंचपदी – तेलुगु ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ.सी.नारायण रेड्डींचा काव्यानुवाद. ४. रात्र एका होडीतली – जागतिक कीर्तीच्या तेलुगु कथांचा अनुवाद. प्रस्तावना – विजय तेंडुलकर, ५. यकृत – नाट्यानुवाद – (साहित्य अकादमी प्रकाशन), ६. योगी वेमना – काव्यानुवाद, ७. अम्मा भगवान – अध्यात्म ग्रंथ, ८. शिर्डी साई अनुग्रह रहस्य – अध्यात्म ग्रंथ.

अशी एकूण १७ पुस्तकं प्रकाशित आहेत, तर दोन कादंबऱ्या प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. १. कविराय रामजोशी, २. कृष्ण देवराय.

माझी तीन पुस्तकं विद्यापीठांच्या एम.ए. अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

आदरणीय पु.ल.देशपांडे यांच्या सहवासाने मी 'आंतरभारतीचा' उपासक झालो. तेलुगुतलं उत्तमोत्तम साहित्य मराठीत अनुवादाच्या रूपाने आणण्याचा प्रयत्न करू लागलो. 'तेलुगु मराठीचा तौलनिक अभ्यास करू लागलो, तेलुगु मराठीतील लिपी, भाषा, साहित्य, संस्कृती, खेळ, नाट्य, शिल्प, अलंकार, आभूषणे, व्रतवैकल्ये, लोकगीते, लोककथा, लोककलावंत आणि संत साहित्य याचा सुमारे एक हजार वर्षांचा धांडोळा घेतला. या अभ्यासासाठी हैदराबाद येथील 'पोट्टि श्री रामुलु, तेलुगु विद्यापीठाने मला 'डी.लिट्'चा पुरस्कार प्रदान केला. १९८८ साली मुंबई येथे भरलेल्या पहिल्या जागतिक मराठी संमेलनात पु.ल.देशपांडे यांनी 'तेलुगु मराठीचा अनुबंध' या विषयावर माझी प्रगट मुलाखत घेतली. याच विषयावर आधारीत पुणे विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, काकतीय विद्यापीठ (आंध्र प्रदेश) हैद्राबाद विद्यापीठ, त्याचबरोबर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. नुकताच मुंबई येथील साहित्य अकादमीच्या क्षेत्रिय कार्यालयात 'अनुवादावर' शोधनिबंध सादर केला.

इ.स.१९९६ साली तेलुगु विद्यापीठ आणि मराठी विकास मंडळाच्या साहाय्याने सोलापूर येथे 'तेलुगु मराठीचे' एकाच व्यासपीठावर संमेलन भरवले. यात तेलुगु मराठी सांस्कृतिक अनुबंध, तेलुगु मराठी संतसाहित्य, तेलुगु मराठी लोकसाहित्य, या विषयांवर भव्य परिसंवाद घडवला. मराठीचे २२ वक्ते तर तेलुगुचे २२ वक्ते यात सहभागी झाले. असे द्विभाषा संमेलन भरवण्यामागे माझा एकमेव उद्देश होता; तो म्हणजे 'भाषिक अंतर संपून, भाषा बांधण्याचं पर्व सुरू व्हावं. 'आंतरभारतीची' संकल्पना रुजावी.

हे द्विभाषा संमेलन गाजलं. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात, 'आंतरभारती'वर एक सत्र जरूर असावं असं वाटतं, असो.

**लक्ष्मीनारायण बोल्ली**
६, विकासनगर, होटगी नाका,
सोलापूर ४१३००३.
मोबा. ९८५००७४१४१.

ओळख

द. ता. भोसले

# आयुष्याचा देखणा कशिदा

आज मराठीत विविध क्षेत्रांतील नामवंतांची जशी आत्मचरित्रे प्रसिद्ध होत आहेत, तशीच ज्याच्या जीवनाला समाजमान्यतेची मोहोर नाही; आणि जे आपल्या तळागाळातल्या विस्कटलेल्या जीवनातून वरती आलेले आहेत, अशा उपेक्षित व म.फुल्यांच्या भाषेत 'शूद्र-अतिशूद्र' समजलेल्या कर्तबगार तरुणांचीही आत्मकथने झपाट्याने वाचकांसमोर येत आहेत. दलित आणि इतर कृषिनिष्ठ व्यवसाय करणाऱ्या सुशिक्षित तरुणांच्या आत्मकथनाने फार मोठी झेप घेतली आहे. लोकप्रियता मिळविली आहे. चित्रपट, नाटक, संगीत, कला व साहित्य या क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या जीवनालेखांनी मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मात्र साहित्य क्षेत्रांतील मान्यवरांनी लिहिलेल्या आत्मकथनापेक्षा व श्री.लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या 'एका साळियाने' आत्मकथनामध्ये एक वेगळी गुणवत्ता दडलेली आहे. आत्मकथनाला एक वेगळा आयाम प्राप्त झालेला आहे. म्हणजे एक तर हे तेलुगु समाजातल्या एका लेखकाचे आत्मकथन आहे; दुसरे म्हणजे ज्यांना साळी किंवा विणकर म्हणतात, त्या समाजातल्या एका धडपडणाऱ्या व्यक्तीचे पहिले आत्मकथन आहे. इथल्या संस्कृतीशी-जनजीवनाशी आणि मराठी भाषेशी एकरूप होऊन मराठीतून लेखन करणाऱ्या लेखकाचे हे आत्मकथन आहे. आणि शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी जिवाच्या भीतीने आपली तेलंगणाची जन्मभूमी सोडून पोट भरण्यासाठी स्थलांतर केलेल्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून त्या पिढीचे दर्शन घडविणाऱ्या लेखकाचे हे आत्मकथन आहे. एवढे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण पैलू मराठीतल्या आत्मकथनाला असतीलच असे नाही. निदान तेलुगु भाषिक व्यक्तीचे मराठीतले हे पहिलेच आत्मकथन आहे, हे नक्की!

त्यामुळेच या आत्मकथनामध्ये दोन संस्कृतीचे दर्शन घडते. दोन भाषांचे व भाषिकांचे दर्शन घडते. मजूर म्हणून राबणाऱ्या कष्टाळू नि जिद्दी माणसाचा एक मालक कसा होतो, याचे दर्शन घडविणारे हे लेखन आहे. दोन प्रकारच्या संस्कृतीमधील श्रद्धा, धारणा, दैवतउपासना आणि जीवनशैली यांचेही येथे दर्शन घडते. म्हणून याला वेगळेपण प्राप्त झालेले आहे. त्यातूनच एका व्यक्तीच्या जीवनदर्शनाबरोबरच येथे एका समाजाच्या जीवनाचेही दर्शन घडते. म्हणजेच व्यक्ती आणि समष्टीचा झालेला संगम या आत्मकथनात आपणास दिसून येतो.

श्री.बोल्ली यांच्या या आत्मकथनात त्यांच्या तेलुगु संस्कृतीची बरीच माहिती मिळते. संस्कृतीची एक नवी ओळख होते. तेलुगु समाजात बतकम्मा नावाचा एक सण साजरा केला जातो. आपल्याकडच्या गौरीच्या सणासारखा. या सणाच्यावेळी फुलांच्या ताट्यात गौरीदेवी म्हणून ओल्या हळदीची मूद ठेवून त्याभोवती स्त्रिया फेर धरून गातात, नाचतात आणि नंतर या बतकम्माचे तळ्यात विसर्जन करतात. त्यावेळी गुळखोबऱ्याचा प्रसाद वाटला जातो. तेलुगु समाजात मृग नक्षत्राच्या प्रारंभी भूमीची पूजा म्हणून कोंबडे मारले जाते आणि गावातले शेतकरी प्रसाद म्हणून त्याचे सेवन करतात. दुसरा विवाह करताना असाच एक धार्मिक विधी करण्याची प्रथा या समाजात आहे. विणकाम करताना गाणी म्हणतात; पंढरीच्या विठोबाची भक्ती करतात. गावातला रेड्डी हा जमीनदार साऱ्या गावातील लोकांना गुलाम म्हणून वागवितोच; पण प्रत्येक मजुराच्या विवाहानंतर त्याच्या नवविवाहित स्त्रीला पहिल्या दिवशी त्या जमीनदाराकडे पाठविण्याची एक अमानुष प्रथा गेल्या शतकापर्यंत रूढ होती. तेलुगु समाजात राहत्या घरासमोर दररोज रांगोळी घातली जाते आणि घराच्या

खालच्या फूट-दीड फूट भिंतीला कावेचा रंग देऊन त्यावर 'तिनेलु चित्रे' काढण्याची प्रथाही या समाजात आहे. खेड्यातला शेतकरी सकाळी ताज्या सिंदीचा एक गडगा पिऊन घेतल्यावरच बाकीच्या कामाला प्रारंभ करीत असे. मार्कंडेय देवाची कुलदेवता म्हणून होणारी उपासना, अशा कितीतरी गोष्टी सांस्कृतिक दर्शनाचा भाग म्हणून येथे जाता जाता चित्रित झालेल्या आहेत.

आत्मकथनाच्या सर्व कसोट्या लक्षात घेतल्या, की श्री.लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे 'एका साळियाने' हे आत्मकथन बऱ्यापैकी यशस्वी झाले आहे, असे म्हणावेसे वाटते; कारण त्यात गतिमान व सजीव व्यक्तित्वाचे दर्शन घडते. व्यक्तीच्या पार्श्वभूमीवर समाजाचे दर्शन घडते. बऱ्यापैकी तटस्थ भूमिका घेऊन ते लिहिलेले आहे आणि आपल्यातला 'मी' ओळखण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे. यात त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनातील सारेच चढउतार नोंदविलेले नसले; तरी एका कलावंताचा शून्यापासून सुरू झालेला प्रवास कसा विस्तारत गेला, कसा झळाळत गेला, कसा शिखरस्थ होत गेला, याचा मनोज्ञ परिचय करून दिला आहे. मातृभाषा मराठी नसलेला एक शाळकरी मुलगा निबंध लेखनात नंबर काढतो, किंवा पाचवीत असलेल्या मुलाच्या चित्राला जिल्ह्यात दुसरा क्रमांक मिळतो; किंवा मित्रांच्या मदतीने एखादे नाटुकले बसवून त्याचा दिमाखदार प्रयोग केला जातो. या साऱ्या कलावंताच्या पाऊलखुणा या आत्मकथनात उमटल्या आहेत. कविता, नाटक, दिग्दर्शन, अभिनय, चित्रकला, कथा, संगीतिका, संशोधन, अनुवाद या क्षेत्रांत त्यांनी केलेल्या चढत्या-वाढत्या कर्तृत्वाचा आलेख येथे पहावयास मिळतो. विडंबन कविता असो; अथवा लावणीसारखी रचना असो, आव्हान घेऊन त्यावर स्वत:ची

**एक तर हे तेलुगु समाजातल्या एका लेखकाचे आत्मकथन आहे; दुसरे म्हणजे ज्यांना साळी किंवा विणकर म्हणतात, त्या समाजातल्या एका धडपडणाऱ्या व्यक्तीचे पहिले आत्मकथन आहे. इथल्या संस्कृतीशी- जनजीवनाशी आणि मराठी भाषेशी एकरूप होऊन मराठीतून लेखन करणाऱ्या लेखकाचे हे आत्मकथन आहे. आणि शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी जिवाच्या भीतीने आपली तेलंगणाची जन्मभूमी सोडून पोट भरण्यासाठी स्थलांतर केलेल्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून त्या पिढीचे दर्शन घडविणाऱ्या लेखकाचे हे आत्मकथन आहे.**

नाममुद्रा उमटविण्याची किमया श्री.बोल्लींच्या लेखनाने केलेली आहे. एखाद्या लेखकाच्या व्यक्तित्वाला एवढे पदर– एवढे पैलू क्वचितच पहावयास मिळतात. कारण अनेकदा आपण पाहतो, की जो कवी असतो, तो कथालेखक असतोच असे नाही; आणि जो नाटककार असतो, त्याला कविता जमतेच असे नाही. चित्रकला आणि अभिनय या क्षेत्रांत यशस्वी झालेले साहित्यिक आपणाला फारसे दिसणार नाहीत. अशा विविध कलांचा सुंदर संगम लेखकाच्या ठायी झालेला असल्याने त्यांचा कलावंत म्हणून झालेला प्रवास हा आनंददायी वाटतो. थोडासा चकितही करून जातो.

थोडासा चकित करून जातो,' असे म्हणण्याचे कारण असे, की एक हौस म्हणून नानाविध कलांच्या अंगणात दुडदुडणे वेगळे; आणि त्या अंगणात पुसली जाणार नाही, अशी रांगोळी घालणे वेगळे. एखाद्या नाटकातली चार वाक्ये रंगमंचावर येऊन म्हणण्यासाठी तोंडाला रंग लावून कलावंत म्हणून मिरविणे वेगळे; आणि महाराष्ट्राच्या नाट्यस्पर्धेत अंतिम फेरीमध्ये अत्युच्च यश संपादन करणे वेगळे असते. श्री.बोल्लींनी नाटकात उडी घेतली आणि त्यात प्रथम क्रमांक मिळविला. दिग्दर्शनक्षेत्रात उतरले आणि त्यातील दुसरे स्थान संपादन केले. काव्यस्पर्धेत भाग घेतला; तेथेही प्रथम क्रमांक पटकावला. लावणीसाठी मांड ठोकली; आणि त्यांच्या गळ्यात प्रथम क्रमांकाची माळ घातली गेली. ज्या कलाक्षेत्रात आपण उतरू, तेथे आपल्या कलेचे, आपल्या सर्जनशक्तीचे अत्युच्च दर्शन आपण घडवू, असा असणारा लेखकाचा आत्मविश्वास आपणास चकित करून जातो, यात शंका नाही.

या आत्मकथनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एका कलावंताच्या विकसित जीवनाप्रमाणेच एका व्यक्तीच्या जीवनातल्या धडपडींचाही समांतर पद्धतीने विकास चित्रित केलेला आहे. उदा. वयाच्या दहाव्या वर्षी प्राथमिक शिक्षण मधेच थांबल्यामुळे श्री.बोल्ली यांना अंबिका डाइंग कंपनीत नोकरी करावी लागली. रंगवलेल्या दहा–दहा पेट्या खांद्यावर घेऊन खातेदारांच्या दुकानावर त्यांना जावे लागले आहे. इयत्ता सातवीच्या परीक्षेपूर्वी आणि दर उन्हाळ्यात श्री.बोल्ली आणि दशरथ यांनी पाजणी जोडणे, कांड्या भरणे, लड्या उकलणे आणि हातमागावर कापड विणणे यांसारखी कष्टाची कामे केलेली आहेत. पुढील काळातही नाना प्रकारची कामे, नोकरी, उद्योग करीतच त्यांनी आपली वाङ्मयीन कारकीर्द सिद्ध केलेली आहे. अनेक मानपमानाचे प्रसंगही त्यांनी समंजस वृत्तीने पचविले आहेत. त्यांच्या आयुष्यातील या साऱ्या धडपडींचा आपल्या मनावर परिणाम होतोच; पण काही जीवनाला उन्नत करणारे विचारही त्यांच्या जीवनातून निष्पन्न होतात, हे विशेष म्हणावे लागेल. 'कोणत्याही श्रमाची माणसाला लाज वाटता कामा नये; श्रमपूजा हीच खरी ईश्वरपूजा होय. दारिद्र्य हा काही मानवी जीवनाला मिळालेला शाप नव्हे; उलट कर्तृत्वाला प्रेरणा देणारी ती शक्ती आहे. ते एका अर्थाने वरदान आहे. प्रतिकूल परिस्थितीला शरण जाण्यापेक्षा त्या परिस्थितीलाच शरण आणण्यात माणसाचे मोठेपण असते. लढा देण्यासाठी मुहूर्त बघण्याचे कारण नसते. जीवनात आपणाला शाश्वत स्वरूपाचे समाधान आणि शांती हवी असेल, तर आत्म्याचा संदेश प्रमाण मानून आपण जगले पाहिजे. अत्युच्च श्रेणीचे यश संपादन केल्यावर हुरळून जाण्यात अर्थ नसतो; ते यशही व्यक्तीला पचवता आले पाहिजे.' ही आणि यांसारखी काही सत्ये त्यांच्या आत्मकथनाच्या वाचनातून आपल्या मनावर बिंबतात, यात शंका नाही. चिंतनाचा चाळा निर्माण करण्याची शक्ती ज्या आत्मकथनात असते, ती माहितीतून तृप्ती देणाऱ्या आत्मकथनापेक्षा केव्हाही वरच्या श्रेणीतील निर्मिती मानली पाहिजे. श्री.बोल्ली यांच्या 'एका साळियाने' या आत्मकथनाची श्रेणी अशी वरच्या दर्जाची जाणवते.

वाचनीय आत्मकथनामध्ये प्रत्ययकारी, गतिमान आणि समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडणे आवश्यक असते, या निकषावर हे आत्मकथन न्याहाळले, तर यामध्ये श्री.लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या समृद्ध व्यक्तित्वाचे प्रसन्न दर्शन घडते. कारण इथे लेखकाने परिस्थितीशी झुंज घेतलेली बघावयास मिळते. कसोटीच्या प्रसंगाच्यावेळी दाखवलेले धैर्य बघावयास मिळते, कलेवरील अविचल निष्ठा इथे अनुभवाला येते. मूल्यनिष्ठ जीवनावरील श्रद्धा आणि त्यातून आलेले झपाटलेपण बघायला मिळते. थोरामोठ्या लेखकांच्या सहवासातून, त्यांनी केलेल्या प्रेमातून लाभलेली धन्यता इथे वाचायला मिळते. वेगवेगळ्या कलांसाठी केलेली धडपड आपणास प्रभावित करते. प्रेमाच्या कसोटीवेळी आलेल्या अनुभवांची सल जाणवून जाते. घराण्याचा उचित अभिमान इथे त्यांच्या व्यक्तित्वाला संपन्न करतो. आजोबा आणि वडिलांच्या कर्तृत्वाला उजळून टाकतो आणि त्यातून एक गतिमान होत गेलेले, समृद्ध होत गेलेले, नानाविध अनुभवांतून शहाणे

बनत गेलेले व्यक्तिमत्त्व सजीव होऊन सातत्याने आपणाशी हितगुज करीत असते. आत्मकथनाच्या पानापानांवर लेखकाच्या पावलांचा आवाज ऐकायला आला पाहिजे, अशी जी अपेक्षा आंद्रे मोर्वा या लेखकाने व्यक्त केली आहे, ती या आत्मकथनामध्ये पुरेपूर जाणवून जाते. म्हणून सप्तरंगांनी आणि सप्तसुरांनी डवरून जाणाऱ्या एका प्रत्ययकारी व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात आपण म्हणजे वाचक वावरत आहेत, याचा प्रत्यय येतो. हा या आत्मकथनाचा एक प्रसन्न विशेष म्हटला पाहिजे.

या आत्मकथनाचे आणखी एक विलोभनीय वैशिष्ट्य असे की, या लेखनात नानाविध माणसांची मांदियाळी म्हणजे दुसऱ्या शब्दांत एक ''आर्ट गॅलरी' आपणास भेटते. नाना स्वभावांची, नाना गुणदोषांनी लिप्त असलेली, नाना वयाची, खास खोड्या अंगी असलेली, माणुसकीने ओथंबलेली आणि अहंकारांनी काजळलेली अशी अनेक माणसे लेखकाच्या जीवनात आलेली आहेत. त्यांच्या आचार-विचारांचे पदर लेखकाच्या जीवनात समाविष्ट झालेले आहेत. कष्ट, धैर्य, जिद्द आणि ध्यास यांचे मूर्तिमंत प्रतीक असलेले लेखकाचे आजोबा नरसय्या, स्वकर्तृत्वाने सोलापूर नगरीचे प्रथम नागरिक बनलेले पिताजी, मारकुट्या मास्तरांपासून, जीव लावणाऱ्या आजीपासून बंधुतुल्य असलेल्या अनेक मित्रांपर्यंत कितीतरी माणसांची मांदियाळी इथे आहे! इथे नानाविध साहित्यिक, कलावंत, मित्र, विचारवंत, वक्ते, कवी, अधिकारी, राजकीय पुढारी तेलुगु समाजातील कार्यकर्ते अशा अनेकांच्या उपस्थितीमुळे हा जीवनप्रवास गजबजून गेला आहे. शंकरराव चव्हाण, सुशिलकुमार शिंदे, वसंतदादा पाटील, शरदराव पवार, गंगाधर कुचन, उल्हास पवार अशासारख्या मान्यवरांची नावे येथे आपणाला भेटतात आणि त्यांच्याशी असलेल्या नात्यांतून ही मांदियाळी अधिक श्रीमंत झाली आहे, याची जाणीव आपणाला होते.

या साऱ्या गोष्टींमुळे 'एका साळियाने' या आत्मचरित्राला मनोसंस्कारांचे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे, हा याचा आणखी एक विशेष म्हणावा लागेल. आजकाल चंदेरी दुनियेत रमणाऱ्या आणि केवळ मनोरंजनाची भूमिका घेऊन लिहिलेल्या आत्मकथनाची लाट आलेली आहे, त्यांच्या पार्श्वभूमीवर हे आत्मकथन या वैशिष्ट्यामुळे उठून दिसते. डॉ.श्रीराम लागू यांच्यासारख्यांचे आत्मकथन मात्र त्या लाटेतील लेखनापेक्षा सर्वस्वी भिन्न आहे, हे मुद्दाम नमूद केले पाहिजे.

थोडक्यात असे म्हणता येईल, की ज्ञान आणि कलोपासना यांच्यासाठी आसुसलेल्या एका तेलुगु भाषिक युवकाने केलेला हा आत्मोद्धार आहे. हे आत्मकथन म्हणजे निष्ठा, समर्पण आणि श्रम यांच्याद्वारे कला, साहित्य यांच्या अत्युच्च शिखरावर जाता येते याचा जणू आदर्श म्हणावा लागेल. साध्या विणकरापासून तो बँक मॅनेजरापर्यंत आणि बासरी वादकापासून तो संपादकापर्यंत केलेला विकास नोंदविणारी ही जीवनकहाणी आहे. या आत्मकथनातून माणसे जोडण्यासारखे दुसरे धन नाही, असा संदेश आपणाला घेता येतो. पंखात बळ देणारी आणि आकाश कवेत घेणारी भक्ती, प्रीती आणि ध्येयावृत्ती या लेखनात दिसते. महाविद्यालयाच्या पहिल्या दुसऱ्या पायरीवर उभे राहून माघारी परतलेल्या आणि प्रारंभी मंदबुद्धीचा म्हणून हेटाळणी झालेल्या एका पोराची ही झेप उमेद निर्माण करणारी वाटते. तसेच आपले जगणे श्रीमंत करण्याची ऊर्जा यातून आपणास मिळते. म्हणून हे आत्मकथन स्वत:वर नाराज असलेल्या नि स्वत:वर रुष्ट असलेल्या व्यक्तीने जरूर वाचले पाहिजे. कारण त्यातून स्वत:ला 'ओळखण्याची', स्वत:ला 'शोधण्याची' प्रेरणा त्याला मिळाल्याखेरीज राहणार नाही.

**द. ता. भोसले**
'भोसले बंगला', आय.एम.ए. हॉल समोर,
हॉटेल नागालँडच्या मागे, डाक बंगल्याजवळ,
पंढरपूर, जि. सोलापूर ४१३३०४.
मोबा. ९४२२६४६८५५.